# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५२-२४** **दिनांक १८/०९/२०२४**

## आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या एकाच पंधरवड्यात नायगाव पोलीसांनी वाचविले तीन महिलांचे प्राण.

दिनांक १८/०९/२०२४ रोजी सकाळी ०९-०० वाजताच्या सुमारास नायगाव पोलीस ठाणे हद्दीतील नायगाव पर्वु परीसरात कुमारी निलम वय-१६ वर्षे (बदललेले नाव )हिने घरातील सिलींगला दुपट्टा बांधुन वॅाशींग मशीनवर चढुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत असल्याबाबत पोलीसांना ११२ वर कॅाल आल्यानंतर पोलीस शिपाई संतोश घुगे यांनी घटनेचे गांभिर्य ओळखुन तात्काळ घटनास्थळास भेट दिली. सदर मुलीने घराच्या दरवाज्याला आतुन कडी लावुन आत्महत्येचा प्रयत्नात असतांना घुगे यांनी प्रसंगावधान दाखवुन घराचा दरवाजा तोडुन प्रवेश केला असता सदर मुलगी वॅाशिंग मशीनवर चढुन आत्महत्येच्या प्रयत्नात असतांना मिळुन आली. सदर मुलीला तात्काळ बाजुला करुन तिचे समुपदेशन करुन तिला आत्महत्येपासुन परावृत्त करुन तिचे प्राण वाचवीले. सदर मुलीला तिच्या आईने घरगुती कारणावरुन ओरडल्यामुळे तिने सदरचे पाऊल उचलले असल्याचे कळुन आले आहे.

तसेच दिनांक १३/०९/२०२४ रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास नायगाव पुर्व येथे राहणाऱ्या एका विवाहित महिलेने गळफास लावल्याची माहिती रात्रोगस्त अधिकारी सपोनि/ पालकर यांना मिळाल्याने त्यांनी सदर ठिकाणी तात्काळ जावुन प्रतिसाद दिला असता सदर ठिकाणी विवाहीत महिला नामे कविता (बदललेले नाव ) या २४ वर्षीय महिलेने साडीला गळफास लावलेला असतांना स्थानीक लोकांनी दरवाजा तोडुन तिची साडी कापुन तिला खाली उतरवल्याचे दिसुन आले. मात्र सदर वेळी त्या महीलेची प्रकृती गंभीर व ती बोलण्याच्या स्थितीत नसलेली व तिचे शरीर थंड पडत असल्याचे समजुन आल्याने सपोनि पालकर यांनी तात्काळ सदर महिलेला खाजगी वाहनामध्ये घेवुन जावुन ज्युचंद्र येथील सामन्य रुग्णालय येथे प्रथमोपचारासाठी तात्काळ दाखल केल्यानंतर वैद्याकीय अधिकारी यांनी तिला ऑक्सीजन व सलाईन लावुन प्राथमीक उपचार दिले. त्यानंतर सदर महिलेला आय.सी.यु. उपचाराची आवश्यकता असल्याने पोलीसांनी सदर महिलेला ॲम्बुलन्स मध्ये टाकुन वसई पश्चिम येथील खाजगी रुग्णालयामध्ये दाखल केले. सदर महिलेवर तिन दिवस उपचारानंतर तिला डिस्चार्ज देण्यात आला. सदर महिलेचे व तिच्या पतीचे कैटुंबीक कारणावरुन वाद असुन सदर घटनेतुन तिने सदरचे पाऊल उचलले असल्याचे समजुन आल्याने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री रमेश भामे यांनी सदर दांम्पत्याला त्यांचे दालनात बोलावुन समुपदेशन कैले. त्यानंतर सदर दाम्पत्यांने त्याच्यातील वाद विसरुन नव्याने संसार सुरु करणार असल्याचे ग्वाही देवुन समाधान व्यक्त करुन पोलीसांचे आभार मानले.

दि.०१/०९/२०२४ रोजी दुपारी ०१.३० वाजताच्या सुमारास नायगाव पुर्व परीसरात राहणाऱ्या नवरा बायकोचे जोरात भांडन चालु असुन तुम्ही तात्काळ मदत करा, असा कॉल सदर भांडनातील महिलेच्या भावाने उत्तरप्रदेश येथुन डायल ११२ या क्रमांकावर कॉल केल्यानंतर कर्तव्यावरील पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनास्थळास तात्काळ भेट दिली असता सदर बिल्डींगच्या खाली लोक जमा झालेले व घरातुन भांडनाचा आवाज येत असल्याची माहीती मिळाल्याने संतोश घुगे यांनी आत घरात प्रवेश केला असता रचना कुलकर्णी

वय-३७ वर्षे (बदललेले नाव) या महिलेने गॅलरीकडे पळत जावुन १३ व्या मजल्यावरुन उडी मारण्याचा प्रयत्न केला असता पोलीस शिपाई संतोश घुगे यांनी चातुर्याने प्रसंगावधान दाखवुन सदर महिलेचे केस पकडुन तिला उडी मारतांना पकडले. त्यानंतर सदर महिलेला लिफ्टने बिल्डींग खाली घेवुन आले तसेच सदर महिलेला व तिच्या पतीला पोलीस ठाणेला आणुन त्यांची रितसर तक्रार ऐकुन घेतली. सदर महिलेचे पती हे काहीएक काम धंदा करत नसुन ते घरामध्ये लक्ष देत नाही व विनाकारण वाद घालत असतात त्या त्रासाला कंटाळुन तिने सदरचे पाऊल उचलले असल्याचे चौकशी दरम्यान समजुन आले.

आपत्कालीन परिस्थीतीमध्ये पोलीस मदतीकरीता डायल ११२ ही प्रणाली मागील ४ वर्षापासुन चालु करण्यात आलेली असुन त्याद्वारे कॉल आल्यानंतर पोलीसांचा प्रतिसाद देण्याच्या वेळेमध्ये देखील खुप उल्लेखनीय बदल झालेला आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ मदत पाहोचवीण्यासाठी पोलीसांनी बऱ्याचवेळा प्रतिसाद देवुन अनुचीत प्रकार टाळण्यासाठी प्रतीबंध केलेला आहे. सदरच्या प्रणालीद्वारे स्थानीक पोलीस स्टेशन कडील अधिकारी/अमलदार यांनी कमीत कमी वेळामध्ये प्रतीसाद द्यायला हवा यासाठी दर महिण्याच्या गुन्हे बैठकीमध्ये पोलीस आयुक्त हे प्रतिसाद वेळेचा आढावा घेत असुन चांगला प्रतिसाद देणाऱ्या पोलीस स्टेशनला बक्षीस तसेच उशीरा प्रतीसाद देणाऱ्या पोलीस स्टेशनचा खुलासा मागुन नेहमी पाठपुरावा घेत असतात. तसेच श्रीमती पौर्णीमा चौगुले, पोलीस उपआयुक्त परीमंडळ-२ व श्री नवनाथ घोगरे, सहायक पोलीस आयुक्त, वसई विभाग हे देखील दर मागील २४ तासातील कॉलला किती वेळेमध्ये पोलीसांनी प्रतिसाद दिला ह्याबाबत दररोज सकाळी आढावा घेऊन पोलीस स्टेशनला सुचना देत असतात.